अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# शालेय बसवाहतूक ही सरकारची जबाबदारी

शालेय शिक्षणाबाबत सगळ्याच पातळीवर अक्षम्य हेळसांड होत राहते. शालेय विद्यार्थ्यांच्या वाहतुकीबाबत पुन्हा असाच गोंधळ घालून राज्याचे शिक्षण विभाग आपल्या बौद्धिक दिवाळीचे प्रदर्शन करीत आहे. विद्यार्थ्यांची ने आण करण्याकरता आता यापुढे खासगी बसेसचाच वापर केला पाहिजे, अशा प्रकारचा फतवा शासनाने काढला आहे. आतापर्यंत छोटी मारुती व्हॅन, रिक्षा किंवा दहा-पंधरा सीटर्सच्या छोट्या बसेसमधून विद्यार्थ्यांची ने आण केली जाते.जसे वाहन उपलब्ध होईल आणि जे आर्थिकदृष्ट्या परवडेल, असा सोयीचा मार्ग पालक स्वीकारतात. विशेषत: मध्यमवर्गीय पालकांना रिक्षा ही सर्वाधिक सोयीची वाटते कारण थेट घरापाशी येणारे आणि कमी पैशांमध्ये आपल्या मुलाला शाळेत पोहचवणारे वाहन म्हणून पालकांची त्याला जास्त पसंती आहे. परंतु या रिक्षामध्ये कोंबले जाणारे विद्यार्थी ही निश्चितच चिंतेची बाब असते कारण एकेका रिक्षामध्ये दहा-दहा विद्यार्थी बसवून धोकाच पत्करला जात होता. त्यानंतर मोठ्या आणि घरापासून जास्त लांब असलेल्या शाळांसाठी मोठ्या बसेसचा वापर केला जातो. पालकांना जसे उपलब्ध होईल, तशा खासगी बसेस भाड्याने घेतल्या जातात. परंतु त्यांच्याबाबतही पालकांच्या तक्रारी येऊ लागल्या. सुरक्षिततेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांची अधिक काळजी घ्यावी, असा हेतू मनात ठेवून सरकारने गेल्यावर्षी नवीन नियमावली तयार केली. केवळ शालेय विद्यार्थ्यांसाठीच असलेल्या या स्कूल बसेसच्या बाबतीत सुरक्षिततेचे काही नियम तयार केले गेले. तरी देखील त्याची योग्य ती पूर्तता झाली नाही. अपघात टळावेत विद्यार्थ्यांची सुरक्षितता वाढावी. हा त्यामागचा प्रामाणिक उद्देश होता तरी याबाबतचे जे एक सर्वसमावेशक धोरण आखले जायला हवे होते ते आखले गेले नाही. हा विषय असा रेंगाळत राहिला. खासगी बसचालकांची अरेरावी रोखण्याचा उद्देशही त्यामागे होता. त्यांनी पालकांना वेठीला धरू नये. असाही प्रयत्न होता. या सगळ्या गोष्टींचा विचार करून त्यावरचा उपाय म्हणून आता खाजगी बसेसची सक्ती करण्याचा नवा निर्णय घेतलेला दिसतो. यातला आश्चर्याचा भाग म्हणजे या संदर्भातली जबाबदारी शाळेच्या मुख्याध्यापकांवर टाकली गेली आहे. खरे तर मुख्याध्यापकांचे हे काम नाही. शाळेबाहेरच्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेम ध्ये किंवा खासगी बस चालकांच्या वादामध्ये मुख्याध्यापकांना गोवण्याचे काहीच कारण नाही.

## शिक्षणावरचा खर्च कमी करा

साध्या शालेय बसबाबत राज्याचे शिक्षण खाते जर एवढा गोंधळ घालत असेल तर विद्यार्थ्यांच्या भवितव्याचे अधिक घनिष्ठ संबंध असलेल्या अभ्यासक्रमाचे धोरण ठरवताना हा शिक्षण विभाग किती घोळ घालत असेल याचा अंदाज येतो. राज्याच्या शिक्षण खात्याम ध्ये सर्व काही आलबेल चाललेले नाही, हे या निर्णयावरून पुन्हा एकदा सिद्ध होते. आज राज्याच्या सर्व मध्यम आणि मोठ्या शहरांमध्ये शिक्षणाचा खर्च अवाढव्य पद्धतीने वाढतो आहे. आपल्या मुलाला कमीत कमी खर्चात चांगले शिक्षण मिळावे, अशी प्रत्येक पालकाची इच्छा असते. परंतु सरकारच्या विनाअनुदानित तत्त्वामुळे शिक्षणाचा खर्च प्रचंड प्रमाणात वाढत चालला आहे. खासगी संस्थाचालक वाटेल त्या पद्धतीने फी आकारतात.सरकारचे त्यावर नियंत्रण जरी असले तरी संस्था आपला खर्च भागवण्याकरता वेगवेगळ्या युक्त्या करून पालकांचा खिसा रिकामा करत असतात. या खर्चाची तोंडमिळवणी करणे पालकांना जड जात असताना आता खासगी बसेसनेच आपल्या मुलांना पोहचवले पाहिजे, असा नवा भुर्दंड पालकांवर लादला जात आहे. वाढत्या महागाईच्या दिवसात शिक्षणाच्याबाबतीत हा वाढीव खर्च सहन करणे दुरापास्त आहे, याची जाणीव सरकारने ठेवायला हवी. केवळ एकतर्फी निर्णय घेऊन आपण फार मोठे विद्यार्थी हित पाहिले अशा भ्रमामध्ये सरकारने राहू नये. आज सामान्य माणसाला शिक्षणच नव्हे तर शहरामध्ये त्यासोबत येणाऱ्या अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. ताणतणावांना सामोरे जावे लागते.अशा परिस्थितीत जे शिक्षण कमीत कमी खर्चात आणि सहजसाध्य व्हायला हवे ते दुरासाध्य करण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे.

## तज्ज्ञांची समिति नेमा

शिक्षणमंत्री दर्डा यांनी आपण फार मोठ्या शैक्षणिक हिताचा आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा निर्णय घेतला आहे, असे समजण्याचे कारण नाही. खरे तर शासनाचे सर्व निर्णय हे सामान्य माणसाच्या हिताचे आणि त्याला आर्थिकदृष्ट्या सवलतीचे असले पाहिजेत. त्याची शिक्षणाची गरज ही इतरांचे भांडवल ठरता कामा नये. किंवा त्या गरजेचा शासनासकट इतरांनी गैरफायदाही घेता कामा नये. दुर्दैवाने आज शिक्षणाच्याबाबतीत हा प्रकार जास्त होत आहे. ज्या गोष्टी सरकारने अधिक विचारपूर्वक आणि तज्ज्ञांच्या संमतीने करायला हव्यात. त्या होत नाहीत. मंत्रालयात बसणाऱ्या अधिकाऱ्यांच्या सांगोवांगीवर सगळेच निर्णय होत आहेत. शालेय विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी जर सुरक्षितता हा महत्त्वाचा मुद्दा असेल तर वाहतूक विभागाच्या अंतर्गत स्वतंत्र यंत्रणा उभारली गेली पाहिजे. रिक्षा, मारुती व्हॅन किंवा बसेस या तिघांनाही शालेय विद्यार्थी पोहचवण्याची सोय असली पाहिजे. त्यासाठी संख्येवर मर्यादा घालता येईल. परंतु सरसकट केवळ बसेसचाच निर्णय लादून सामान्य माणसाचे आर्थिक गणित कोलमडेल, असे होता कामा नये. सरकार आपल्या जबाबदाऱ्या पालकांच्या आणि मुख्याध्यापकांच्या गळ्यात घालून मोकळे होण्याचा प्रयत्न करत आहे. शालेय बसवाहतूक हा पूर्णपणे वाहतूक विभागाने हाताळण्याचा विषय आहे ही जबाबदारी तज्ज्ञांची समिति नेमून सरकारने अधिक दक्षतेने स्वीकारली पाहिजे.